

# पोटासाठी उत्तर दिशा...

रायकरच्या खोलीतून आज मी आपणहून जाणार होतो. या अगोदरच्या सगळ्या ठिकाणांहून मला काढून टाकण्यात आलं होतं किंवा जायला भाग पडण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यात आली होती. आज मात्र मी आपणहून जाणार होतो. रायकरनं माझ्यावरच्या त्याच्या प्रेमामुळे मला मुंबईतूनच बाहेर जायला सांगितलं होतं. दुर्धर व्याधीनं मी मरू नये, म्हणून त्यानं नाइलाजानं हा सल्ला दिला होता. त्याला तशी शंका आली नसती, तर जन्मभर मला त्या खोलीत राहाता आलं असतं. रायकरला त्याचा आनंदच झाला असता; पण मी मुंबई सोडणं आवश्यक आहे, हे नियतीलाही पटलं असावं.

रायकरबरोबर बोलून प्रथम नाशिकला जायचं नक्की केलं. मुंबईहून उत्तरेच्या मार्गावर तेच पहिलं मोठं गाव होतं. एक-दोनजणांच्या पुढं हात पसरला आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे एका परिचित सुहृदानं मला दोन रुपये दिले. दोन पैसेसुद्धा उसने मिळण्याची मारामार पडत होती, तिथं एकदम दोन रुपये मिळावे, हा नियतीचाच कौल असला पाहिजे. त्या रात्री राइसप्लेट खाल्ली. थोडीशी खरेदी केली. त्यात आठ आणे खर्च झाले. त्या वेळी मुंबई-नाशिक मोटारभाडं १२ आणे होतं. मोटारी रात्री निघत, घाटापाशी येऊन थांबत आणि पहाटे घाट पार करत.

आमच्या खोलीतल्या सगळ्यांना खूप वाईट वाटत होतं. अगदी खऱ्या अर्थानं आम्ही सारे जिवाभावाचे मित्र बनलो होतो. मुंबई सोडताना माझी स्थिती मोठी विचित्र झाली होती.

अगदी लहानपणी, पण जाणत्या वयामध्ये, वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षी मी प्रथम मुंबईत आलो. ज्या वेळी संस्कार कळतात, जाणवतात आणि अंगी बाणतात, अशा वयामध्ये मुंबईत डॉ. भाजेकरांच्याकडे मला राहायला मिळालं. त्यांनी स्वच्छतेच्या, बोलण्याच्या, वागण्याच्या अशा कितीतरी गोष्टी हळुवारपणानं शिकवल्या. 'आर्यन

शाळे'सारख्या राष्ट्रीय संस्कार करणाऱ्या शाळेत काही वर्षं शिकलो. याच मुंबईत मी मोठमोठ्या राजकीय सभा पाहिल्या. प्रचंड मिरवणुका, सत्याग्रह, लाठीहल्ला, घोडेहल्ला, गोळीबार पाहिला. बाबू गेनूचं बलिदान पाहिलं. लहानपणी कोल्हापुरात झालेले राष्ट्रीय संस्कार जास्त प्रभावीपणानं मनावर ठसले ते याच मुंबईत. बोलण्याचालण्यातला, वागण्यातला नीटनेटकेपणा याच मुंबईत शिकलो. गोपाळराव येरकुंटवारांसारख्या, हिंदुत्वप्रणालीपासून साम्यवादापर्यंत सर्व विचारांचा सखोल अभ्यास केलेल्या, बुद्धिवादी, तळमळीच्या आणि आयुष्य संघकार्यासाठी वाहिलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या सहवासात काही काळ राहायला मिळाल्याचं भाग्य याच मुंबईत मला लाभलं. अनेक जिव्हाळ्याचे सोबती जसे मिळाले, तसेच त्यांच्या स्वार्थापायी माझं आयुष्य भिरकावून देणारे सज्जन समजले जाणारे महाभागही माझ्या वाट्याला आले, ती मुंबई हीच.

याच मुंबईत मी 'रेडिओस्टार' झालो. इथंच मला अब्दुल करीम खाँसाहेबांच्या हातून शास्त्रीय संगीताच्या स्पर्धेत प्रथम पारितोषिकाचा मान मिळाला. संगीत-दिग्दर्शक म्हणून 'विझलेली वात' या नाटकात माझं नाव प्रथम छापून आलं, ते याच शहरात. संघाच्या निर्मळ वातावरणात अनेक दिवस समाधानातच नव्हे, तर धुंदीत गेले, ती नगरी हीच. माझ्या आयुष्याच्या वैराण अवस्थेत वैद्यकुमार रायकरसारखा एक देवमाणूस मला भेटला, तो याच नगरीत. या नगरीनं मला प्रेम दिलं, जिव्हाळा दिला, थोडासा लौकिकही दिला, आपण काही करू शकतो ही जाणीव दिली. इथला प्रत्येक भाग, प्रत्येक रस्ता, प्रत्येक गल्ली माझ्या पायांखालून गेलेली. इथल्या चौपाटीवर मनसोक्त हुतूतू खेळलो, इथल्या व्यायामशाळेत मातीनं अंग माखून घेतलं. कुस्त्या खेळलो, मल्लखांब केला, अशी ही माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेली मुंबई. सुखाबरोबर छळ झाला, अपमान झाला, मरणप्राय यातना सोसाव्या लागल्या, तरीही जिची अनिवार ओढ सतत आहे, अशी ही मुंबई!

ही मुंबई आज मी सोडून जाणार होतो. पुन्हा कधी इथं यायला मिळणार होतं की नाही, कुणास ठाऊक! मन गलबलून गेलं होतं. खूपखूप रडायला येत होतं. आतल्या आत रडू दाबून ठेवीत होतो. सगळ्यांचा निरोप घेतला. गाडगीळनं माझा हात घट्ट दाबून धरला. गेले आठ महिने तो माझ्याबरोबर निष्कारण हाल काढत होता. मला साथ देत होता. त्याला हुंदके आवरणं कठीण झालं.

मी पिशवी उचलली. निर्धारानं पाऊल खोलीच्या बाहेर टाकलं आणि मागं वळून न पाहता २१७, क्राऊन बिल्डिंगच्या पायऱ्या उतरलो. ट्रॅममध्ये बसलो. दीड रुपयातला एक आणा कमी झाला. मोटार स्टँडवर आलो. नाशिकचं तिकीट काढलं. मोटार सुरू झाली. मी मुंबईचं डोळे भरून अखेरचं दर्शन घेतलं आणि डोळे मिटून स्वस्थ बसून राहिलो. थोड्याच वेळात मला झोप लागली.

### नाशिकची हालत

सकाळी सकाळी नाशिक आलं. अनोळखी गाव. कुठं जायचं माहीत नव्हतं. तिथले

संघचालक परिचयाचे होते. पण त्यांच्याकडे जाणार नव्हतो. एका देवळात गेलो. देवाला नमस्कार केला. पिशवी ठेवली. हातपाय धुतले. चहाची खूप तल्लफ आली होती, पण मन आवरलं. देवळाजवळ नदीकाठ होता, तिथं आडोशाला जाऊन प्रातर्विधी उरकला. नदीत अंघोळ केली. कुणाकडं जावं, हा विचार करत बसलो. काही सुचेना. असा प्रसंग आयुष्यात यापूर्वी कधी आलाच नव्हता. त्यामुळे सुरुवात कशी करावी, ते कळत नव्हतं.

गावात एक फेरफटका मारावा म्हणून निघालो. डॉक्टर-वकिलांच्या पाट्या बघत चाललो. मनाचा निग्रह करून एका वकिलांच्या घरात शिरलो. आत गेलो. पण त्यांना काय विचारायचं, ते सुचेना. शेवटी मन घट्ट करून विचारलं, "मी मुंबईहून आलोय, गाणारा आहे, माझा एखादा कार्यक्रम आपण कराल का? काहीही पैसे दिलेत तरी चालेल." त्यांनी सरळ सरळ धुडकावून लावलं. ते गडबडीत होते. एवढंच म्हणाले, "हे पाहा, असल्या गोष्टी करायला मला वेळ नाही." ते आत निघून गेले आणि मी बाहेर पडलो. स्वत:ला खूप शिव्या दिल्या. तेव्हा खरोखर असं वाटलं होतं की, आता आणखी कुणाहीकडं जायचं नाही.

काही वेळ हा निश्चय टिकला. पण दुपारची वेळ झाली आणि खिशातल्या ११ आण्यांचा विचार मनात आला, तेव्हा पुन्हा लाचार बनलो. एका डॉक्टरांच्या घरी गेलो. त्यांच्यासमोर तोच पाढा वाचला. या वेळी मात्र 'मी रेडिओस्टार आहे,' ही पुस्ती जोडली. त्यांनी पहिल्या वकिलांची पुनरावृत्ती केली नाही. पण फरक एवढाच होता की, जे सांगायचं, ते त्यांनी शांतपणानं आणि थोड्या विस्तारानं सांगितलं. ते म्हणाले, "तुम्हांला कोणीही नावानं ओळखत नाही. मग पैसे देऊन तुमचं गाणं कोण ऐकणार? इतकं करून कोणी जबाबदारी पत्करलीच, तर आठ-पंधरा दिवसांचा वेळ त्याला लागेल. चार-दोन आणे प्रत्येकी अशी वर्गणी करून काही होऊ शकेल. पण तुम्ही इतके दिवस थांबायला तयार आहात का?"

त्यांचं बोलणं खरं होतं. मी कोण होतो की, ज्याच्यासाठी कुणीही पटकन उठावं आणि म्हणावं, 'हो हो, मी तुमचा कार्यक्रम जमवतो.' मी बाहेर आलो. खिशात हात घातला. ११ आणे होते. भटकत बाजारपेठेत आलो. एका माडीवर पाटी लावली होती- राइसप्लेट अडीच आणे. पाटीकडे पाहिलं. खिशात हात घातला. खूप भूक लागली होती, तरी मन आवरलं. पुन्हा देवळात आलो. आडवा झालो. मनात नाना तऱ्हेचे विचार येत होते. अनोळखी शहरात येऊन पडलो होतो. कुणीच कार्यक्रम केला नाही तर? परत कुठं जायचं? आणि कसं? ११ आणे हां हां म्हणता संपतील! त्यानंतर काय? उसने पैसे कोण देणार? कुणाकडं मागितले तर लफंगा म्हणतील. काहीतरी बहाण्यानं पैसे मागायला अनेक भामटे येतात, त्यांतलाच एक मला समजतील. तळमळत होतो. ऊन उतरल्यावर पुन्हा उठलो. लोकांचे उंबरठे झिजवायला लागलो. पण कुणीच 'हो' म्हणेना. संध्याकाळी संघाच्या शाखेत गेलो. श्री. दादासाहेब गोरवाडकर भेटले. त्यांनाही मी 'कुठं कार्यक्रम जमवता का,' म्हणून विचारलं. मात्र माझी ११

आण्यांची 'श्रीमंती' त्यांना सांगितली नाही.

जादूसारखं काही घडून येणार नाही, हे मला कळत होतं. पण कुणी मनावर घेतलं असतं, तर चार-पाच दिवस मी कळ काढली असती. रुपया, दोन रुपये, चार रुपये, पाच रुपये काहीही मिळाले असते, तरी चाललं असतं. मला एक खात्री होती की, एकदा माझं गाणं झालं की, त्या प्रसिद्धीवर मला आणखी एकदोन कार्यक्रम मिळाले असते. नाशिकहून पुढच्या गावी जाता आलं असतं. रात्री देवळाच्या फरशीवर झोपलो. तो सबंध दिवस उपास काढला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. पुन्हा आदल्या दिवशीचाच प्रकार सुरू केला. पण व्यर्थ. कुणीच 'हो' म्हणेना. त्या दुपारी अडीच आण्याची राइसप्लेट खाल्ली. पुन्हा हिंडायला सुरुवात केली. निदान दहाबारा लोकांच्या घरी जाऊन त्यांची विनवणी केली, पण काही उपयोग झाला नाही. त्या रात्री जेवलो नाही, एकदा चहा घेतला. आता आठ आणे शिल्लक राहिले. आठ आण्यांत कुठल्या गावी जाता येईल, याचा विचार करायला लागलो. त्या बाजूच्या कुठल्याच गावाची मला माहिती नव्हती, म्हणून चौकशी करू लागलो. आणखी एक दिवस होता. काही विचार न करता सरळ गेलो आणि अडीच आण्यांची राइसप्लेट खाल्ली.

आता रायकरचाच राग येऊ लागला. त्याचं ठीक होतं. कीर्तन करायला काही कुणाची मनधरणी करावी लागत नाही. देवळात उभं राहिलं की, कीर्तन होतं. गाण्याचं तसं नव्हतं. धाय मोकलून रडावंसं वाटत होतं. मुंबईतून निघून कुठल्या भयानक संकटात येऊन पडलो होतो!

संध्याकाळी संघशाखेत गेलो. शरीरात मुळीच शक्ती नव्हती. एका बाजूला बसलो होतो. एक स्वयंसेवक जवळ आला. त्यानं माझी चौकशी केली. मी भडाभडा त्याला सारं काही सांगून टाकलं. मला वाटतं, त्याच्या रूपानं नाशिकचा रामच प्रत्यक्ष माझ्यापुढं उभा होता. त्यानं मला विचारलं, ''तू मालेगावला जाशील? तिथं माझे एक शिक्षक आहेत. त्यांचा मी आवडता विद्यार्थी आहे. मी त्यांचा पत्ता- पत्र देतो. ते तुझा कार्यक्रम करतील.''

मी चटकन 'हो' म्हटलं. बुडत्याला काडीचा आधार आणि माझ्या दृष्टीनं नाशिकात बुडणं आणि मालेगावला बुडणं यांत काहीच फरक नव्हता. त्यानं मला तिथल्या तिथं एक पत्र दिलं. त्या शिक्षकाचं नाव होतं, श्री. सी. वाय. काळे. मालेगावला वसंतवाडीत ते राहात होते. त्या स्वयंसेवकाचे मी खूपखूप आभार मानले. मला सतत एक हळहळ गेली काही वर्षं लागून राहिली आहे की, त्या स्वयंसेवकाचं, त्याच्या रूपानं मला भेटलेल्या रामाचं नाव ध्यानात राहिलं नाही. अनेक वर्षं आठवत होतं, पण नंतर कसा विसरलो, ते तो रामच जाणे. जन्मोजन्मी फेडता येणार नाहीत, असे उपकार त्या स्वयंसेवकानं माझ्यावर करून ठेवले आहेत.

ते पत्र घेऊन मी देवळात आलो. पुन्हा एक भयंकर प्रश्नचिन्ह उभं होतं. मालेगावला जायला पैसे कुठून आणायचे? माझ्याजवळ साडेपाच आणे शिल्लक होते. आणि मालेगावला जायला किती भाडं पडतं, ते विचारायचं राहून गेलं होतं. अचानक एक

विचार मनात आला. मुंबईत एकदा मी एक प्रयोग केला होता. चोरबाजारात जाऊन माझा कोट विकून आलो होतो. इथं तेच करायचं ठरवलं. ज्या खानावळीत राइसप्लेट खायला दोनदा गेलो होतो, तिथंच गेलो. मालकांना म्हटलं, 'हा कोट घेऊन मला एक रुपया द्याल का?' त्यामागचं कारणही सांगितलं. त्यांनी कोट घेतला नाही, पैसेही दिले नाहीत. फुकट जेवायला मात्र घातलं.

त्यावेळी नाशिक-मालेगाव-मोटारभाडं पाचच आणे होतं. सकाळी मालेगावच्या मोटारीत बसलो. नाशिकची मला चांगली आठवण दोन कारणांकरता राहिली आहे. अनेकांच्या मनधरण्या करूनही कुणी कार्यक्रम केला नाही, हे एक आणि नाशिकनंच मला पुढचा मार्ग दाखवला, हे दुसरं.

– कै. सुधीर फडके

(श्री. श्रीधर फडके यांच्या परवानगीने 'जगाच्या पाठीवर' या आत्मचरित्रातून क्रमशः)